ISSN 2231-1629
Knowledge Resonance

● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# भारतामधील व्यापारी बॅकांच्या विकासात्मक वाटचालीचा चिकित्सक अभ्यास

डॉ. बालासाहेब शिवाजी पवार
वाणिज्य विभाग,माधवराव पाटील महाविद्यालय
पालम. जि. परभणी

भारतीय अर्थव्यवस्था .शीवर अधारित आहे म्हणून शीला भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असे म्हटले जाते.. यावर अधारीत उदयोग धंदे उभारण्यासाठी भांडवलाची अवश्यकता आहे. पैशाची गरज पूर्ण करण्यासाठी बॅंकिंग क्षेषाची भुमिका अत्यंत महत्वाची आहे. भारत देशाचा मागील 70 वर्षाच्या काळात जलद विकास झालेला आहे.देशाच्या .कृषी, उदयोग व व्यापार, दळणवळण आणि वाहतूक इत्यादी क्षेषाच्या भांडवल विषयक गरजा पुर्ण करण्याचे कार्य बँकिंग क्षेत्राद्वारे केले जात आहे. तसेच सर्वसामान्य व्यक्तीच्या जिवनात बँक एक अविभाज्य व महत्वपूर्ण असे अंग बनलेली आहे.

आजच्या नविन तंत्रज्ञानाच्या व स्पर्धात्मक युगात बँकप्रणाली अर्थिक सेवा व सुविधा पुरविण्याच्या उद्देशाने निर्माण कली आहे. ज्या प्रमाणे मानवी शरिरात रक्त वाहिण्याना स्थान असते, त्याच प्रमाणे देशाच्या अर्थव्यवस्थेत बँकेचे स्थान देखिल महत्वाचे असते. बँकांचा विकास हा देशाच्या अर्थिक प्रगतीचा पाया मानला जातो.म्हणजेच देशाची अर्थिक प्रगति आणि उन्नती यांचे बँक व्यवसायात अतुट असे नाते आहे.जगातील वेगवेगळया देशात होत असलेल्या आर्थिक व्यवहाराचे सर्वकार्य पूर्ण करण्याकरिता बँकप्रणाली अत्यंत महत्वाची भुमिका बजावत आहेत.जागतिकी करणामुळे बँकिंग क्षेत्रात फार मोठया प्रमाणात स्पर्धा निर्माण झालेली आहेत. परंतु बँकिंग क्षेत्राच्या वाटचालीचा काळ जगाच्या ई. स. पूर्व कालाखंडात सुध्दा सापडते.तसेच अजच्या बँकिंग व्यवस्थेची निर्मिती युरोप खंडातील देशातुन झालेली आहे. थोडक्यात भारतामधील व्यापारी बॅकांच्या विकासात्मक वाटचालीचा चिकित्सक अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उदिष्टये:**

प्रस्तुत शोध निबंधाकरीता स्वंतत्र पुर्व व स्वांतत्र्यानंतरच्या काळातील व्यापारी बँकांच्या विकासात्मक वाटचालीचा अभ्यास केला आहे.

1) स्वातंत्र्यपुर्वकाळाचा अभ्यास.
2) स्वातंत्र्यानंतरच्या काळाचा अभ्यास.
3) नविन अर्थिक सुधारणांचा अभ्यास.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत शोध निबंधाचा अभ्यास करण्याकरीता प्रामुख्याने दुय्यम साधनसामुग्रीचा अधार घेऊन माहीती गोळ करण्यात आली आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, व्रतपशे व संकेतस्थळाचा अधार घेऊन विषलेश्नात्मक तसेच वर्णननात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधनाची मर्यादा:**

भारतीय बँकिंग क्षेषाच्या व्यवस्थेच्या विस्ताराची व्याप्ती फार मोठी आहे.देशात आज बँकांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. प्रस्तुत शोधनिबंधात केवळ भारतामधील व्यापारी बँकांच्या विकासात्मक वाटचालीचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे इतर बँकांच्या अभ्यासाकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

**बँकेचा अर्थ:**

भारत देशाच्या अर्थिक विकासात बँकांचा फार मोठा वाटा आहे. पत्त पैसा निर्माण करणे आणि अर्थव्यवस्थेत योग्य विनीयोगाद्वारे पैशाच्या .यशक्तित वाढ करणे हे कार्य बँकेद्वारे केले गेले पाहिजे. बँकेचा व्यवहार म्हणजे पैशाचा व्यवहार होय. सामान्य जनता,व्यापारी,उत्पादक,उदयोजक यांच्या करीता महत्वाचा दुवा म्हणून बँक म्हत्वपूर्ण जवाबदारी पार पाडीत असते.

**व्याख्या:**

1) वॉल्टर लिफः "बँक म्हणजे जनतेकडुन ठेवी स्वीकारणारी व मागणी करणाऱ्या व्यक्तिना धनादेशाद्वारे ठेवी परत करणारी संस्था होय".

2) भारतीय बँकिंग कंपनी कायदा ( 1949 ) :"लोकांकडुन ठेवीच्या स्वरुपात गुंतवणुक अथवा कर्ज देण्याच्या हेतूने पैसे स्वीकारणारी व त्या ठेवीदाराना मागणी करताच धनादेशाद्वारे ड्राट,आदेशाद्वारे अथवा इतर पध्दतीने परत करणारी संस्था म्हणजे बँक होय".भारतामधील व्यापारी बॅकांच्या विकासात्मक वाटचालीचा चिकित्सक अभ्यास :

बँकिंग क्षेत्राच्या विकासाची सुरूवात जगात अमेरिका, युरोप

आणि अशिया खंडात झालेली आहे.ई.स.पूर्व 2000 वर्षापूर्वी ग्रीसमध्ये 'बॅबीलोन' मधुन बँक व्यवसायाची सुरूवात झाली असे पुरावे आहेत. 12व्या शतकात बँक व्यवसायाचे पुनरुजीवन होऊन प्रगतीला चालणा मिळाली आहे. तसे पहाता खरेतर ई. स.1157 मध्ये युरोपात 'बँक ऑफ व्हेनिस' ही सार्वजनिक क्षेत्रातील पहिली बँक निर्माण झाली. तसेच पुढे हॉलंड, फ्रान्स,जर्मनी, इंग्लंड व जगातील इतर देशात वेगवेगळ्या बँका स्थापन करण्यात आल्या.पहिल्या महायुध्दापूर्वी व दुसऱ्या महायुध्दाच्या काळात अशिया खंडात आधुनिक बँकांची उत्क्रांती झाली आहे.विशेषतः भारत व जपान या देशात प्रगती झाल्याचे स्पष्ट होते. थोडक्यात भारतातील व्यापारी बँकांच्या विकासात्मक वाटचालीचा अभ्यास पुढील प्रमाणे करता येईल.

### 1) स्वातंत्र्य पुर्वकाळ (1770 ते 1946):

स्वातंत्र्य पुर्वकाळात देशातील शेतकरी व्यापारी व कारागीर यांना लागणाऱ्या रोख पैशाची गरज ततकालिन भांडवलदार वर्ग, अर्थात सावकार वर्ग यांच्या द्वारे पूर्ण केली जात असे. सुरूवातीला व्यापारी म्हणून आलेले ब्रिटिश देशाचे राज्यकर्ते व सत्ताधिस बनले. खऱ्यार्थाने इंग्रजांच्या माध्यमातून बँकांची निर्मिती होण्यास सुरूवात झाली. कोलकत्यामध्ये सन.1770 युरोपीयन बँकिंग व्यवस्थेवर अधारित 'हिदुस्थान बँक' ही भारत देशातील पहिली अधुनिक बँक स्थापना करण्यात आली. परंतु 1832 मध्ये ही बँक बंद झाली. त्यानंतर 1) 1806 मध्ये बँक ऑफ बेंगाल 2) 1840 मध्ये बँक ऑफ बॉम्बे आणि 3) 1843 मध्ये बँक ऑफ मद्रास या तीन बँकांची स्थापना करण्यात आली. पुढे 1921 या तीन बँका एकत्रित करुन 'इंपिरियल बँकेची' निर्मिती करण्यात आली. 1935 पर्यंत ही बँक रिझर्व्ह बँकेची बरीच कार्य करीत होती.

1894 मध्ये पंजाब नॅशनल या दुसऱ्या क्रमांकाच्या बँकेची स्थापना करण्यात आली.भारतीय लोकांनी स्थापन केलेली पहिली भारतीय बँक म्हणुन संबोधली जाते.तसेच 20व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात विविध 10 व्यापारी बँका स्थापन झाल्या व त्याबँका पुढील प्रमाणे आहेत.

1) बँक ऑफ इंडिया 1906 2) कॅनरा बँक 1906 3) इंडियन बँक 1960 4) बँक ऑफ बडोदा 1908 5) सेंट्रल बँक ऑफ इंडिया 1911 6) सिंडीकेट बँक 1925 7) बँक ऑफ महाराष्ट्र 1935 8) इंडियन ओव्हरसिज बँक 1936 9) देना बँक 1938 10) युनायटेड कमर्शियल बँक 1943 वरील प्रमुख व्यापारी बँका स्वातंषपूर्व काळात स्थापन झाल्या. तसेच विविध व्यापारी बँका आज भारत देशात महत्वाची भुमिका बजावत आहेत. भारतीय बँकांच्या विकासाचा स्वातंष्यपुर्वकाळ महत्वाचा वाटत आहे.

### 2) स्वातंत्र्यानंतरचा काळ (1947ते2098):

स्वातंत्र्य पुर्वकाळातील स्थापन झालेल्या अनेक सयुंक्त भांडवली बँका विविध कारणामुळे बुढाल्या, या पार्श्वभुमिवर 1948 मध्ये 'बँक व्यवसाय नियमन कायदा' करण्यात आला. मात्र हा कायदा 1949 पासुन लागू करयात आला. खऱ्या अर्थाने हा कायदा 1949 पासून लागू करण्यात आला. रिझार्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन तिला व्यापक अधिकार देण्यात आले. त्याचा परिणाम बँकांच्या ग्रामीण विस्तार करण्यासाठी झाला.

#### अ) स्टेट बँक ऑफ इंडिया (1955) :

ए.डी.गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली सन. 1951 मध्ये अखिल भारतीय ग्रामीण पत्त पुरवठा पाहणी समिती नेमण्यात आली. या समितीने 1954 ला आपल्या शिफारशी रिझर्व्ह बँकेला सादर केल्या. त्यानुसार 1955 मध्ये इंपिरियल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन स्टेट बँका ऑफ इंडिया ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंदोर या दोन बँकांचे एस.बी.आय मध्ये विलीनीकरण करण्यात आले. देशातील सर्वात मोठी बँक म्हणुन स्टेट बँक ऑफ इंडिया कार्यरत आहे.

#### ब) 8 सहयोगी बँका (1959) :

भारत सरकारने 1959 मध्ये पुर्वीच्या विविध संस्थानातील 8 बँक ऑफ इंडियाच्या सहयोगी बँका बनल्या ज्यामध्ये 1) स्टेट बँक ऑफ हेद्राबाद 1942 2) स्टेट बँक ऑफ इंदोर 1920 3) स्टेट बँक ऑफ म्हैसुर 1913 4) स्टेट बँक ऑफ त्रावणकोर 1945 5) स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र 1902 6) स्टेट बँक ऑफ जयपुर 1943 7) स्टेट बँक ऑफ बिकानेर 1943 8) स्टेट बँक ऑफ पटीयाला 1917 या विविध बँकांचा समावेश होतो.सन 2008 व 2010 मध्ये स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र व स्टेट बँक ऑफ इंदोर या दोन बँकांचे एस.बी.आय मध्ये विलीनीकरण करण्यात आले. 1 एप्रिल 2017 स्टेट बँकांच्या सहयोगी बँकांचे अस्तित्व संपुष्टात आले.

#### क) राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या 14व्यापारी बँकां (1969):

19 जुलै 1969 रोजी सरकारणे ज्या बँकांच्या ठेवी रु 50 कोटी पेक्षा अधिक होत्या अशा चौदा मोठया व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ग्रामीण भागामध्ये शाखा विस्तार करणे,

प्राधान्यक्रम क्षेषाला कर्ज पुरवटा करणे,प्रादेशिक असमतोल दुर करणे याउददेशाने खालील 14 बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.त्या पुढील प्रमाणे.....

1) सेंट्रल बँक ऑफ इंडिया 2) बँका ऑफ इंडिया 3) पंजाब नॅशनल बँक 4) बँक ऑफ बडोदा 5) युनायटेड कमर्शिअल बँक 6) कॅनरा बँक 7)युनायटेड बँका ऑफ इंडिया 8) देना बँक 9) युनियन बँका ऑफ इंडिया 10) अहलाबाद बँक 11) सिंडिकेट बँक 12) इंडियन ओहरसीज बँक 13) इंडियन बँक 14) बँक ऑफ महाराष्ट्र.

**ड) राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या 6व्यापारी बँकां (1980):**

15 एप्रिल 1980 रोजी राष्ट्रपतीने वटहुकुम काढुन ज्या बँकांच्या ठेवी रु 200 कोटी पेक्षा अधिक होत्या अशा व्यापारी बँका म्हणजे. 1) अंध्रा बँक 2) कॉपोरेशन बँक 3) न्यु बँक ऑफ इंडिया 4) ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स 5) पंजाब ॲन्ड सिंध बँक 6) विजया बँक या 6 व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

3) नविन अर्थिक सुधारणा (1991):

1991 मध्ये देशात जागतीकी करणाचा स्वीकार करण्यात आला व त्याचा परिणाम इतर क्षेत्रावर देखील झाला. तसेच वित्तीय सुधारण्यासाठी नियुक्त केलेली नरसिंहम समिती. नरसिंहम समिती–1 (1991) आणि नरसिंह समिती –2 (1997) यानी आपल्या बँकिंग क्षेत्रासंदर्भात शिफारशी सादर केल्या. या दोन्हीचा परिणाम बँकिंग क्षेष विदेशी बँकांना तोंड देऊ शकेल व अधिक कार्यक्षमपणे काम करुशकतील ,या उद्देशाने बँकांचे विलीनीकरण करण्याचे काम सातत्याने चालू आहे.त्यामुळे सदया स्थितीला व्यापारी बँकांची संख्या कमी होत असताना दिसते. याचा परिणाम म्हणजे अलीकडच्या काळात जानेवारी 2019 मध्ये बँका ऑफ बडोदा मध्ये विजया बँक व देना बँक या दोन्हीचे विलीनीकरण करण्यात आले आहे. भविष्यात भारत सरकार देशातील इतर व्यापारी बँकांचे विलीनीकरण करण्याची शक्यता आहे.

**निष्कर्ष:**

थोडक्यामध्ये भारतीय बँकिंगक्षेत्राच्या विकासाची सुरुवात स्वातंत्र्य पुर्वकाळात झालेली आहे. स्वातंत्र्या नंतरच्या काळात देखिल यात वृध्दी झालेली दिसुन येते. आजच्या घडीला राष्ट्रीयीकरण केलेल्या सर्व बँकांचे विलीनीकरण करण्याचे काम चालू आहे. यामुळे बँका अधिक कार्यक्षम बनुन आपल्या ग्राहकानां सेवा सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.परंतु यामुळे देशातील लहान लहान बँकांचे अस्तित्व संपुष्टात येण्याची दाट शक्यता आहे. रिझर्व्ह बँकेने व सरकारणे या बाबीकडे गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे.

***संदर्भ सुची :***

*1) डॉ.बी.बी पहुरकर–बँक व्यवसाय व वित्त*

*2) गंगाधर कायंदे पाटील–भारतीय बँकिंग व्यवस्था*

*3) अर्थसंवाद (2012)–भारतीय अर्थव्यवस्था*

*4) डॉ.एम.डी कच्छवे व इतर (2019)–भारतीय बँकिंग व्यवसाय, श्रध्दा प्रकाशन सोलापुर*

*5) आर.परमेश्वरन आणि नटराजन (2019)–इंडियन बँकिंग,एस. चन्द पब्लिकेशन दिल्ली.*

*6) प्रतियोगीता दर्पण (2017)–भारतीय अर्थव्यवस्था,उपकार प्रकाशन, अग्रा.*

*7) शंकर तळेकर,प्रा.जवाहर काबरा–भारतीय बँकिंग व्यवस्था*

*8) दत्त व महाजन (2017)–भारतीय अर्थव्यवस्था,एस.चन्द प्रकाशन,दिल्ली.*